.01C 769

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां-३/भोप्र/मा.क्र.१४/४६००/२०१९ दि.०४/११/२०१९.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

**वाचा** - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र२१३७ दि.२३/११/२०११

२) सुधारित बा.प./संमती पत्र क्र. २८९३, दि. २१/१२/२०१८.

३) विकसक मे. इव्होलेट डेव्हलपर्स यांनी वास्तुविशारद आर्कि. आतिक मलिक यांचे मार्फत केलेला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा विनंती अर्ज. (आ.क्र.५४५३ दि. २६/०८/२०१९ )

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि./०४/११/२०१९.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **सि.स.नं. ४२३ मंगळवार पेठ, फा.प्लॉट क्र. २८ टी.पी.एस.-२, पुणे** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन घटक) इमारतीस या कार्यालयाकडून अंतिम संमती पत्र जा. क्र झोपुप्रा/तां.३/२८२९/२०१८ दि.२१/१२/२०१८ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे B इमारतीमधील पार्ट (B१) च्या पहिल्या मजल्यापर्यंतचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका/ गाळे इ.साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक मे. इव्होलेट डेव्हलपर्स यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

**इमारत "B" मधील (पार्ट) B१ - पुनर्वसन इमारत + विक्री इमारत (Composite)**

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|---|
| १) | बेसमेंट | -- | स्कुटर पार्किंग | -- |
| २) | लोअर ग्राउंड | दुकाने ३,४,५,६,१४,१७ | दुकाने १,२,१३,१८ + १ गोडाऊन A | १० दुकाने + १ गोडाऊन |
| ३) | अप्पर ग्राउंड | -- | शोरूम A,B,E,F | ४ शोरूम |
| ४) | पहिला मजला | -- | १०६, १०७, १०८,१०९,११०,१११,११५,११६ | ०८ ऑफीस |

पुनर्वसन घटक - बिगर निवासी दुकाने - ०६

एकूण - ०६ दुकाने

विक्री घटक - दुकाने - ०४

गोडाऊन - ०१

शोरूम - ०४

ऑफिस - ०८

---

एकूण - दुकाने ०४ + गोडाऊन ०१ + शोरूम ०४ + ऑफिस ०८

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) प्रकरणी सादर हमीपत्रानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

**सहाय्यक संचालक नगररचना**
**झो.पु.प्रा., पुणे.**

O/C

प्रत :- १) **मे. इव्होलेट डेव्हलपर्स**
इम्तीयाज आर. कुरेशी,
फा.प्लॉट नं. २८/A-१
सि.टी.एस.४२३ मंगळवार पेठ,
पुणे - ४११०११

२) आर्कि. आतिक मलिक
हार्मोनि बिल्डिंग, नानापेठ,
पुणे

३) **तहसिलदार, ताबा विभाग,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) **संगणक अधिकारी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.

Recied.
5/11/2019.